N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** इस्लामपूर **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0197 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 31/03/2022 22:42 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार **Date From (दिनांक पासून):** 11/12/2021
   **Time Period (कालावधी):** पहर 3 **Date To ( दिनांक पर्यंत):** 11/12/2021
   **Time From (वेळेपासून):** 07:07 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 07:36 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 31/03/2022 **Time (वेळ):** 21:26 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 036 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 31/03/2022 21:26 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 5 किमी
**Beat No. (बिट क्र.):** '

(b) **Address (पत्ता):** कामेरी,वाळवा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** सुनिल रामचंद्र सराफदार

**(b) Father's Name (वडील चे नाव) :** रामचंद्र सराफदार

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1972 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | फाळकेवाडी फाटा, बागणी ,वाळवा ,इस्लामपूर,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | फाळकेवाडी फाटा, बागणी ,वाळवा ,इस्लामपूर,सांगली,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9356975545

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विकास तातोबा गुरव | राजू | | 1. शिवपुरी रोड, कामेरी ,तावाळवा, .इस्लामपूर,सांगली,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दी जबाब दि.31.03.2022

मी सुनिल रामचंद्र सराफदार, वय 50 वर्ष व्यवसाय- खाजगी नोकरी रा. मु. पो. फाळकेवाडी फाटा, (बागणी) ता.वाळवा जि. सांगली मो.नं 9356975545.

मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासहीत राहण्यास आहे. मी इचंलकरंजी ता शिरोळ जि. कोल्हापूर येथे खाजगी नोकरी करतो. मी फाळकेवाडी (चंदवाडी) ता. वाळवा जि. सांगली येथील गट नं 53/3/ब मधील वडीलार्जीत शेतजमीनी पैकी 20 गुंठे क्षेत्र श्री. मुनीर आबालाल मेस्त्री रा. वारणानगर ता. पन्हाळा जि. कोल्हापूर यांना विक्री केलेली होती. सदरबाबत दि.26.04.2012 रोजी दस्त केलेला होता. त्यानुसार फेरफार क्रमांक 2346 दि.01.10.2012 अन्वये नोंद मंजूर झाली होती. परंतू सदर विक्री केलेल्या जमीनीचा श्री. मुनीर आबालाल मेस्त्री यांनी ठरलेला व्यवहार पुर्ण केला नसल्याने मी तलाठी कार्यालय फाळकेवाडी येथील त्यावेळचे तलाठी यांना अर्ज करून फेरफार क्रमांक 2346 हा रद्द करून घेतला होता त्यामुळे श्री. मुनीर आबालाल मेस्त्री यांचे नावाची सातबारा उतायावर मी विक्री केलेल्या क्षेत्रावर नोंद झालेली नव्हती.

तसेच श्री. विजयकुमार गणपती माळी रा.आष्टा ता. वाळवा जि. सांगली यांनी मौजे फाळकेवाडी ता.वाळवा येथील गटनं 53/3ब या गटातील जमीन त्यांची आहे असे सांगून माझ्या व माझ्या गटातील इतर इसम असे आमचे विरूध्द मा.अप्पर आयुक्त, पुणे विभाग पुणे यांचे न्यायालयात क्रमांक-आरटीएस/रिव्ही./सांगली/306/2003 अन्वये दाखल केला होता. सदर प्रकरणाचा मा.अपर आयुक्त, पुणे विभाग पुणे यांचेकडून निकालपत्रक झाले असून त्यामध्ये सदर गटातील 2346 अशी नोंद असलेला फेरफार रद्द केलेला आहे. मी दि.24.11.2021 रोजी मौजे फाळकेवाडी ता.वाळवा येथील गट नं 53/3ब या गटाचा सातबारा उतारा काढला होता त्यावेळी मुनिर आबालाल मेस्त्री यांचे नावे 0.04.92 हे. आर.चौ.मी म्हणजेच जवळ पास पावणे पाच गुंठे क्षेत्र नमूद होते व माझ्या नावे 0.25.01 हे.आर.चौ.मी म्हणजेच जवळ पास पंचवीस गुंठे क्षेत्र नमूद होते. सदर सात बारा उतायावरील नोंदी बरोबर होत्या. त्यानंतर दि.26.11.2021 रोजी मुनिर आबालाल मेस्त्री यांनी माझ्या क्षेत्रामध्ये असलेले डांब व फलक काढण्यासाठी जेसीबी मशीन लावले होते त्यावेळी त्यांना विचारणेस गेल्यानंतर त्यांनी मला सदरचे क्षेत्र त्यांचे असल्याचे सांगून तशी सातबारा उतायावर नोंद झाल्याचे सांगीतले.

त्यानंतर मी दि.26.11.2021 रोजी मी मौजे फाळकेवाडी ता.वाळवा येथील गट नं 53/3ब या गटाचा सातबारा उतारा काढला असता त्यामध्ये मुनिर आबालाल मेस्त्री यांचे नावे 0.24.89 हे.आर.चौ.मी असे क्षेत्र वाढून लागले होते व माझ्या नावे 0.05.04 हे.आर.चौ.मी असे कमी क्षेत्र नमूद केले असल्याचे दिसून आले. माझ्या हिस्यातील 20 आर क्षेत्र हे मुनिर आबालाल मेस्त्री यांचे नावे लागले असल्याचे माझ्या लक्षात आले. मी विक्री केलेल्या 20 गुंठे जमीनीचा व्यवहार पुर्ण न झाल्याने मुनिर आबालाल मेस्त्री यांचे नावाची नोंद सदर क्षेत्रावर झालेली नव्हती तसेच मा.अपर आयुक्त, पुणे विभाग पुणे यांचेकडून झाले निकाल पत्रकामध्ये सदर नोंदीचा फेरफार 2346 हा रद्द झालेला आहे. असे असताना



Scanned with CamScanner

देखील कोणतीही शाहनीशा न करता सध्याचे तलाठी श्री. गुरव सजा फाळकेवाडी यांनी मी दि.26.04.2021 रोजी केलेल्या दस्तावरून मौजे फाळकेवाडी ता.वाळवा येथील गट नं 53/3ब यावर मुनिर आबालाल मेस्त्री यांचे नावे 20 गुंठे क्षेत्र चढवले असून माझ्या नावे असलेल्या क्षेत्रामधून 20 गुंठे क्षेत्र कमी केले आहे. सदरबाबत श्री. गुरव, तलाठी सजा फाळकेवाडी यांनी मला कोणतीही पुर्व कल्पना दिलेली नाही. वरीलप्रमाणे प्रकार होणार असल्याची मला शंका होती त्यामूळे मी दि.27.10.2021 रोजी मा. जिल्हाधिकारी सो, सांगली यांना अर्ज केला होता.

दि.27.11.2021 रोजी मी तलाठी कार्यालय फाळकेवाडी येथे जावून तलाठी गुरव यांची भेट घेवून सदरची नोंद चुकीची केली असल्याचे सांगून सदरची नोंद रद्द करण्याबाबत विनंती केली. त्यावेळी तलाठी गुरव यांनी मला चुक झाली असल्याचे सांगून याबाबत सविस्तर चर्चा करू असे सांगून त्यांनी दुसयादिवशी माळी ढाबा, वाघवाडी फाटा या ठिकाणी भेटण्याबाबत सांगीतले. त्याप्रमाणे मी दि.28.11.2021 रोजी त्यांची माळी ढाबा, वाघवाडी फाटा या ठिकाणी भेट घेतली असता तलाठी गुरव यांनी मला सदरची नोंद चुकीची झाल्याचे सांगून सदर चुक दुरूस्ती करून मुनिर आबालाल मेस्त्री यांचे नावे चुकीचे लागलेले क्षेत्र करून कमी करून माझ्या नावे पुर्वी प्रमाणे क्षेत्र वाढ करून देत असल्याचे सांगून त्यासाठी खर्च करावा लागेल असे सांगून दहा लाख रूपयाची जुळणी करा असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना माझी दहा लाख देण्याची परिस्थिती नसल्याचे संागून सदरची चुकीची नोंद दुरूस्त करून देण्याबाबत विनंती केली. त्यावेळी तलाठी गुरव यांनी शेवट सहा लाख रूपये देण्याबाबत सांगून सहा लाख दिल्याशिवाय सदरची चुक दुरूस्त होणार नाही असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना घरी चर्चा करतो असे सांगून निघून आलो.

गुरव तलाठी हे माझ्याकडून 6,00,000/- रूपये घेतल्याशिवाय माझे काम करून देणार नसल्याची माझी खात्री झाल्याने व मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने दि.09.12.2021 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली या ठिक्ाणी हजर राहून श्री. मोरे पोलीस निरीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो सांगली यांचे समक्ष गुरव तलाठी यांचे विरूध्दचा तक्रारी अर्ज दिला. त्यानंतर मोरे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी त्यांचे कार्यालयातून रवाना होवून माझ्या राहत्या घरी हजर झालो. त्यानंतर मोरे साहेब व त्यांचे पथक माझ्या राहत्या घरासमोर दाखल झाले. मी त्यांना माझ्या घरातील एक खोली उपलब्ध करून दिली. मोरे साहेब यांनी त्यांचे सोबत आलेल्या पंच साक्षीदार यांचेशी ओळख करून दिली. तसेच सापळा पथकाची पण ओळख करून दिली. मोरे साहेबांनी सदर कारवाईसाठी श्री.संतोष सुरेश वाघमारे यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री. जितेंद्र श्रीपती वडगावे यांनी पंच नं. 2 म्हणुन काम करण्याचे ठरवले. मोरे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझी लाच मागणीची तक्रार पंचा समक्ष थोडक्यात कथन केली. दोन्ही पंचानी माझा तक्रारी अर्ज वाचून त्यावर सहया केल्या. मोरे साहेब यांनी गुरव तलाठी यांची पडताळणी करण्याचे ठरवले. त्यानंतर मोरे साहेब यंानी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देवून त्यामध्ये नवीन मेमरी कार्ड टाकले. मोरे साहेब यांनी मला व पंच वाघमारे यांना पडताळणी कामी सुचना देवून डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझ्याकडे दिला मी तो माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशात ठेवला. मोरे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी व पंच वाघमारे असे माझ्याकडील हिरो होन्डा कंपनीची मोटरसायकल क्र. एम एच 10 डी एफ 2013 वरून रवाना होवून काकाचीवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालामध्ये असले तलाठी कार्यालयात गेलो. त्या ठिकाणी गुरव तलाठी हजर नव्हते. मी त्या ठिकाणी असलेले माझ्या ओळखीचे इसम लुकनर यांना तलाठी गुरव यांचे बाबत विचारले असता त्यांचेकडून गुरव तलाठी आष्ट¬ाला गेल्याची माहिती मिळाली. मी लुकनर यांना केले विनंती वरून लुकनर यांनी त्यांचे मोबाईलवरून गुरव तलाठी यांना कॉल करून मोबाईल माझ्याकडे दिला. मी तलाठी गुरव यांनी ते इस्लामपूरला असल्याचे सांगून संध्याकाळी सहा साडे सहा वाजता फोन करा असे सांगीतले. माझे तलाठी गुरव यांचेशी बोलणे झाल्यानंतर मी मोबाईल लुकनर यांचेकडे दिला. त्यानंतर मी व पंच वाघमारे त्या ठिकाणावरून निघून मोरे साहेब यांचे समक्ष हजर झालो. मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून मोरे साहेब यांचेकडे दिला. मोरे साहेब यांनी विचारलेवरून पंच वाघमारे यांनी घडलेली हकिगत सांगीतली त्यानंतर मी देखील मोरे साहेब यंाना घडलेली हकिगत सांगीतली. मोरे साहेब यांनी त्या दिवशी सायंकाळी साडे सहा वाजता पुन्हा पडताळणी कारवाई करण्याचे निश्चित केले. त्यानंतर मोरे साहेब व त्यांचे पथक निघून गेले. त्यानंतर काही वेळानंतर मी तलाठी गुरव यांना कॉल केला होता त्यावेळी तलाठी गुरव यांनी मला सायंकाळी सात वाजण्याचे सुमारास कॉल करतो असा निरोप दिला. त्यानंतर मोरे साहेब व त्यांचे पथक सायंकाळी सहा वाजण्याचे सुमारास माझ्या राहत्या घराजवळ दाखल झाले. त्यावेळी मी त्यांची भेट घेवून गुरव तलाठी यांचे निरोपाबाबत माहिती दिली. बराच वेळ वाट बघीतल्यानंतर गुरव यांचा मला कॉल आला नसल्याने मोरे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे पावणे आठच्या सुमारास माझ्या मोबाईलवरून गुरव यांना कॉल केला असता गुरव यांनी कॉल उचलला नाही. त्यानंतर आठ वाजण्याचे सुमारास गुरव यांचा माझ्या मोबाईलवर कॉल आला. मोरे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी गुरव कॉल रिसीव्ह करून मी गुरव यांचेशी बोलणे केले. त्यावेळी गुरव यांनी मला कराडला निघालो असल्याचे सांगीतले. मी गुरव यांना काय करायच असे विचारले असता गुरव यांनी मला उद्या दुपारी सांगलीला जाणार असल्याचे सांगून चार पाच च्या पुढे भेटूया असे सांगीतले. माझे, गुरव यांचेशी मोबाईलवरील संभाषण झाल्यानंतर मी कॉल कट केला. सदरचा कॉल मोरे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व्दारे रेकॉर्ड केला आहे. मोरे साहेब यांनी दि.10.12.2021 रोजी सायंकाळी पाच वाजण्याचे सुमारास पडताळणी करण्याचे निश्चित करून मोरे साहेब व त्यांचे पथक निघून गेले.

दि.10.12.2021 रोजी सायंकाळी पाच वाजण्याचे सुमारास मी माझ्या राहत्या घरी हजर असताना मोरे साहेब व त्यांचे पथक हजर झाले. त्यानंतर मोरे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे पावणे सहा वाजण्याचे मी माझे मोबाईल वरून गुरव यांना कॉल करून मोबाईलचा स्पिकर फोन ऑन केला गुरव तलाठी यांनी कॉल रिसीव्ह केल्यानंतर मी त्यांना पाच वाजून गेले असल्याबाबत सांगीतले असता गुरव यांनी मला इस्लामपूरात असल्याचे सांगून थोडया वेळात फोन करतो असे सांगून कॉल कट केला. सदरचा कॉल मोरे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व्दारे रेकॉर्ड केला आहे. बराच वेळ वाट पाहील्यानंतर सव्वा सात वाजण्याचे सुमारास गुरव माझ्या मोबाईलवर मिस कॉल आला व काही वेळ वाट पाहील्यानंतर गुरव यांचा कॉल आला. मोरे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी, गुरव यांचा कॉल रिसीव्ह करून मोबाईलचा स्पिकर फोन ऑन केला. गुरव यांनी मला "उद्या भेटूया, तुम्ही आणि मी एकटच, तुमचा मुलगा पण नको आणि कोणच नको आपण दोघेच चर्चा करायची, उद्या तिकडून सुटल्यावर कामेरी मार्गे या" असे म्हणाले. आमचेतील चर्चेमध्ये दुसया दिवशी सायंकाळी पाच वाजता भेटण्याचे ठरले. सदरचा कॉल मोरे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे रेकॉर्ड केला आहे. मोरे साहेब यांनी दि.11.12.2021 रोजी पडताळणी कारवाई करण्याचे ठरवून मोरे साहेब व त्यांचे पथक निघून गेले. त्यानंतर काही वेळानंतर गुरव तलाठी यांनी मला कॉल करून उद्या सकाळी 7.00 वाजता कामेरी येथे त्यंाचे राहत्या घरी भेटण्याबाबत निरोप दिला. लागलीच मी मोरे साहेब यांना संपर्क करून माहिती दिली. मोरे साहेब यांनी मला दि. 11.12.2021 रोजी सकाळी 6.00 वाजता येत असल्याचे कळविले.

दि.11.12.2021 रोजी सव्वा सहा वाजण्याचे सुमारास मी माझ्या राहत्या घराजवळ हजर असताना मोरे साहेब व त्यांचे पथक त्यांचेकडील खाजगी कारने मी थांबलो त्या ठिक्ाणी आले. मोरे साहेब यांनी मला गुरव यांचे राहत्या घराचा पत्ता माहीत आहे का असे विचारले असता मी त्यांना गुरव यांचे कामेरी येथील घराचा पत्ता माहित असल्याचे सांगीतले. त्यानंतर मोरे साहेब यांनी मला त्यांचे पुढे रवाना होवून कामेरी गावाच्या आलीकडे आल्यानंतर थांबण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी माझ्याकडील मारूती ओमनी कंपनीची कार क्र.एम.एच.10 सी एक्स 8339 मध्ये बसून ओमनी कारमधून व माझ्या पाठोपाठ मोरे साहेब व त्यांचे पथक असे त्यांचे कडील खाजगी कारमधून रवाना होवून कामेरी गावाच्या काही अंतर आलीकडे कोल्हापूर पुणे हायवेवर दाखल झालो. त्यानंतर मोरे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व मेमरी कार्डबाबत माहिती



Scanned with CamScanner

देवून मेमरी कार्ड डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकून मला व पंच वाघमारे यांना पडताळणी कामी सुचना दिल्या.

त्यानंतर मोरे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझ्याकडे दिला मी तो माझ्या पॅन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशात ठेवला. त्यानंतर मोरे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी व पंच वाघमारे असे माझ्याकडील मारूती ओमनी कारने रवाना होवून कामेरी येथील गुरव तलाठी यांचे घराजवळ दाखल झालो. मी व पंच वाघमारे असे कारमधून उतरून तलाठी गुरव यांचे घराच्या काही अंतरावर चालत जावून मी अण्णासाहेब अशा हाका मारल्या. तलाठी गुरव त्यांचे घरामधून बाहेर आले व त्यांनी मला हाताने येण्याबाबत इशारा केला. त्यानंतर मी व पंच वाघमारे असे पायी चालत गुरव यांचे घरामध्ये गेलो. गुरव तलाठी यांनी आम्हाला बसण्याबाबत सांगून गुरव यांनी त्यांचे घरातील लोक गावाला गेल्याचे सांगीतले. मी गुरव यांना माझ्या कामाबाबत विचारले असता गुरव यांनी मला "तुमच मत काय मला सांगा, मी सांगीतले तसेच केले पाहीजे, दुसरा पर्याय नाही, त्याला पाच सहा महीने जाणार, वेळ लागणार,करून घेतो पण वेळ लागणार, तुमच्या पैशाला जबाबदार मी आहे" असे म्हणाले. मी, गुरव यांना तुम्हीच ठरवा असे म्हणालो. त्यावर गुरव यांनी मला "परवा विषय झाला आहे, परत तो विषय काढायला नको" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना कुठल्या पध्दतीने करायचे असे विचारले. त्यावर गुरव यांनी मला "परवा सांगीतलय तसा विषय संपवूया" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "पुन्हा सर्कलच काय माग लावू नका" असे म्हणालो. त्यावर गुरव यांनी मला "सगळं माझ मी करतो, कागदपत्रे झेरॉक्स मारून द्या" असे म्हणाले. त्यानंतर आमचेत कागदपत्रासंदर्भात चर्चा झाली. आमचेत चर्चा सुरू असताना गुरव यांचे घरामध्ये त्यांचा मुलगा येत जात होता. मी, तलाठी गुरव यांना "फिक्स काय करायचं सांगा" असे म्हणालो. त्यावर गुरव यांनी मला "आता बोलतो, तेच तेच सारख, सांगीतले की तेच तेच सारख कशाला" असे म्हणून गुरव यांनी चहा घेणार काय असे विरचारले. त्यावर आम्ही चहा साठी नकार दिला. त्यानंतर मी, गुरव यांना "दोन टप्प्यात करायच का" असे विचारले असता गुरव यांनी मला "दोन टप्प्यात नाही, पुन्हा यंत्रणा हलवली पाहीजे, असल कोणी केल नव्हत" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना दोन तीन दिवस अवधी देण्याबाबत विनंती केली. त्यावर गुरव यांनी मला "तुमची तयारी झाली की मला फोन करा" असे म्हणाले. त्यावर मी, गुरव यांना सुरवातीला किती द्यावे लागतील असे विचारले. त्यावर गुरव यांनी मला "तुम्हीच सांगा, तुमच काय असेल ते" असे म्हणाले. त्यावर मी, गुरव यांना "तुम्हीच सांगा, रक्कम जास्त असल्यामुळे हलचाल करायला पाहीजे" असे म्हणालो. त्यावर गुरव यांनी मला कधीही करा असे म्हणाले. त्यावर मी त्यांना पैशांची अडचण असल्याचे सांगून सांभाळून घेण्याबाबत विनंती केली. त्यावर गुरव यांनी मला "पैशाची तुमची जुळणी होत्या तेवढी सोमवारी द्या" असे म्हणाले. त्यावर मी, गुरव यांना सोमवारी सहा जमनार नसल्याचे सांगीतले. त्यावर गुरव यांनी मला "सोमवारी जेवढी होईल तेवढी द्या, पुन्हा राहीलेले दुसया टप्प्यात द्या, नाही तर तिसया टप्प्यात द्या, दोन म्हणालो, तिन टप्पे देतो सोमवारी जेवढ होतय तेवढ जास्तीत" असे म्हणाले. त्यावर मी, गुरव यांना सोमवारी किती द्यायचे असे विचारले असता गुरव यांनी मला "तुम्ही होतय तेवढ द्या, सोमवारी निम्मे द्या, ते तर होईल का नाही" असे म्हणाले. त्यावर मी, गुरव यांना तिन लाख का ? असे विचारले असता त्यावर गुरव यांनी हा असे म्हणून होकार दिला. त्यानंतर मी व पंच वाघमारे असे गुरव यांचे घरामधून निघून कारमधून सदर ठिकाणावरून रवाना होवून मोरे साहेब यांचे समक्ष हजर झालो. त्यानंतर मी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मोरे साहेब यांचेकडे दिला. त्यानंतर मोरे साहेब यांनी विचारलेप्रमाणे पंच वाघमारे व मी घडलेली सविस्तर हकिगत मोरे साहेब यांना सांगीतली.

मोरे साहेब यांनी केले पडताळणी कारवाईमध्ये माझ्या जमीनीच्या सातबारा उतायावर झालेली चुकीची नोंद रद्द करण्यासाठी गुरव यांनी माझ्याकडे 6,00,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे व त्यातील निम्मी लाचेची रक्कम 3,00,000/- रूपये सोमवारी देण्याबाबत सांगीतली असल्याचे निष्पन्न झाले. परंतू गुरव यांचे लाच मागणीमध्ये त्यांचे वरिष्ठांचा सहभाग आहे अगर नाही याबाबत खात्री करण्याकरीता गुरव यांचे वरिष्ठ मंडल अधिकारी तसेच इतर वरिष्ठ अधिकारी यांची पडताळणी करण्याचे मोरे साहेब यांनी ठरवले.

दि.16.12.2021 रोजी मी कोरेगांव येथील मंडल अधिकारी माने यांना संपर्क केला होता त्यावेळी माने यांनी मला दि.17.12.2021 रोजी मंडल अधिकारी कार्यालय कोरेगांव येथे भेटण्याबाबत सांगीतले होते. त्याप्रमाणे मी मोरे साहेब यांना संपर्क करून कळविले. दि.17.12.2021 रोजी सकाळी साडे आकराच्या सुमारास मी माझ्या घरी असताना मोरे साहेब व त्यांचे पथक त्यांचेकडील शासकीय वाहनाने घराजवळ दाखल झाले. मी त्यांची भेट घेतली. त्यानंतर मी माझ्याकडील हिरो होन्डा कंपनीची मोटरसायकल वरून तसेच मोरे साहेब व त्यांचे पथक त्यांचेकडील वाहनाने रवाना होवून कोरेगांव ता.वाळवा जि. सांगली गावाच्या काही अंतर आलीकडे दाखल झालो. मोरे साहेब यांनी त्यांचे कार्यप्रणालीप्रमाणे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरू करून माझ्याकडे देवून मला व पंच वाघमारे असे आम्हाला मंडल अधिकारी माने यांची भेट घेणे कामी पाठविले. मी व पंच वाघमारे असे माझ्याकडील मोटरसायकलीवरून रवाना होवून मंडलअधिकारी कार्यालया समोर गेलो. आम्ही पायी चालत कार्यालयात गेलो. सदर ठिकाणी मंडल अधिकारी माने हे हजर होते त्यांचे आजूबाजूस इतर इसम देखील हजर होते. माने यांनी मला "कशाला फोन लावत बसताय" असे म्हणाले. मी माने यांना कामा संदर्भात विचारले असता माने यांनी मला "आज थांबलोय आम्ही इंथ, ते साहेबांना भेटणार आहेत" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना अण्णासाहेब म्हणजेच गुरव तलाठी काय बोललेत का असे विचारले. त्यावर माने यांनी मला तलाठी गुरव काही बोलले नसल्याचे सांगीतले. त्यावर मी, माने यांना "निकाल दिलाय वाटतं तुमच्या कडे" असे विचारले. त्यावर माने यांनी मला "दिला आहे, माझ्या फाईलला आहे,साहेबांना भेटून सांगायचं" असे म्हणाले. मी, माने यांना अण्णासाहेबाची म्हणजेच तलाठी गुरव यांचेशी चर्चा झाली नाही का असे म्हणालो. त्यावर लोकसेवक माने यांनी मला "काय चर्चा नाही, तो लबाड माणूस आहे" असे म्हणाले. त्यावर मी, माने यांना गुरव तलाठी हे दहा द्या म्हणाले होते, त्यांनी सहा ठरवले असल्याचे सांगून प्रत्येक्षात तुमची गाठ घेतल्याशीवाय काय करायचे नाही म्हणून आलो असल्याचे सांगीतले. त्यावर माने यांनी मला "माझी एक वर्ष सेवा राहीली आता, मी फोन करतो तुमाला, आपण कसं सांगणार तुम्हाला, दाखल केल आहे ना प्रांत ऑफिसला" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना दाखल केले असल्याचे सांगून अण्णासाहेबांशी चर्चा झाली असेल तुमची असे म्हणालो. त्यावर माने यांनी मला "चर्चा काय नुसत उलडपणे बोलतोय,मला विश्वास उडला त्याच्यावरनं, काय तर बडबडत बसतोय, मी तुम्हाला फोन करतो, चर्चा करण्या इतपत तो लायक आहे का, मुर्ख पणा काय त्याला नोकरीची काळजी आहे का" असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच वाघमारे असे मंडलअधिकारी कार्यालयातून निघून मोरे साहेब यांचे समक्ष हजर झालो. मी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून मोरे साहेब यांचेकडे दिला. मोरे साहेब यंानी विचारले वरून पंच वाघमारे व मी घडलेली हकिगत मोरे साहेब यांना सांगीतली. माने यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केली नाही. माने यांनी मला फोन करतो असे सांगीतले होते. गुरव तलाठी यांचे इतर वरिष्ठांची पडताळणी करणे बाकी असल्याने गुरव तलाठी यांचेकडून वेळ वाढवून घेण्यासाठी मोरे साहेब यांनी मला व पंच वाघमारे यांना तलाठी गुरव यांची भेट घेण्यासाठी पाठविण्याचे ठरवले. मोरे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे माझ्या मोटरसाकलीने मी कोरेगांव येथून निघून बागणी गावाच्या आलीकडे जावून थांबलो. माझ्या पाठोपाठ मोरे साहेब व त्यांचे पथक त्यांचेकडील वाहनाने मी थांबलो त्या ठिकाणी हजर झाले. त्यानंतर मोरे साहेब यांनी त्यांचे कार्यप्रणालीप्रमाणे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करून माझ्याकडे देवून मला व पंच वाघमारे यांना तलाठी गुरव यांची भेट घेण्यासाठी तलाठी कार्यालयात पाठविले असता गुरव तलाठी यांची भेट झाली नाही. त्यानंतर मोरे साहेब व त्यांचे पथक निघून गेले.

त्यानंतर दि.22.12.2021 रोजी मोरे सोहब यांनी मला संपर्क करून दि.23.12.2021 रोजी 11.00 वाजण्याचे सुमारास कोरेगांव येथे हजर राहण्याबाबत सुचना दिल्या. दि.23.12.2021 रोजी सकाळी 11.20 च्या सुमारास कोरेगांव येथे हजर झालो त्यावेळी मोरे साहेब व त्यांचे पथक कोरेगांव येथे हरज झाले होते मोरे साहेब यंानी मला संपर्क करून कळविलेप्रमाणे मी मोरे साहेब यांची भेट घेतली. त्यानंतर मोरे साहेब



Scanned with CamScanner

यं◌ाची भेट झाली नाही. त्यानंतर मोरे साहेब व त्यांचे पथक निघून गेले. त्यानंतर मोरे साहेब यांनी गुरव तलाठी तसेच माने, मंडल अधिकारी यांनी अथवा त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांनी मला भेटण्याबाबत निरोप दिल्यानंतर पुढील कार्यवाही आयोजीत करण्याचे निश्चित केले होते. परंतू गुरव तलाठी किंवा माने मंडल अधिकारी तसेच त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांनी मला भेटण्याबाबत कोणताही निरोप दिला नाही.

मी दि.04.12.2021 रोजी माझी शेतजमीन असलेल्या मौजे मागणी (फाळकेवाडी) ता.वाळवा जि. सांगली गट नं 53/3 व या गटामधील बेकायदेशीर नोंदी बाबत मंडल अधिकारी माने कोरेगांव व गुरव तलाठी यं◌ाचे विरूध्द तक्रारी अर्ज केला होता. त्याप्रमाणे दि.12.02.2022 रोजी आष्टा पोलीस ठाणे येथील पाटील पोलीस यांनी माझा जबाब नोंदविला आहे. त्यानंतर दि.10.03.2022 रोजी मी आष्टा पोलीस ठाणेस गेलो होतो. त्यावेळी त्या ठिकाणी तलाठी गुरव पोलीस ठाणेमध्ये हजर होते. त्योवळी तलाठी गुरव यांनी मला "तुम्ही पोलीस स्टेशनला तक्रार केली आहे. आता जे होईल ते कायदेशीर होईल" असे म्हणाले. त्यानंतर दि.22.03.2022 रोजी काकाचीवाडी गावामधून जात असताना काकाचीवाडी ग्रामपंचायती शेजारी राहणारे माझ्या ओळखीचे लुकनर यांचेशी माझी माझी भेट झाली होती. त्यावेळी लुकनर यांनी मला तलाठी यं◌ानी कायदेशीर मार्गाने काम करीत असल्याचे सांगितले असल्याचे सं◌ागून तलाठी कार्यालयात न येण्याबाबत निरोप दिला असल्याचे सांगितले. तलाठी गुरव यांनी मला माझे काम कायदेशीर मार्गाने करीत असल्याचे सांगून पुन्हा तलाठी कार्यालयात न येण्याबाबत निरोप दिला आहे. मी यापुर्वी माझ्या शेतजमीनीच्या सातबारा उतायावर बेकायदेशीर नोंद केली असल्याबबात जिल्हाधिकारी कार्यालय, अपर तहसिलदार कार्यालय आष्टा तसेच आष्टा पोलीस ठाणे येथे गुरव तलाठी व माने मंडल अधिकारी यांचे विरूध्द तक्रारी अर्ज केले आहेत. त्या अनुषंगाने संबंधीत कार्यालयाकडून चौकशी सुरू असून सदर तलाठी गुरव तसेच त्यांचे वरिष्ठांना सदर चौकशीला सामोरे जावे लागत असून त्या कारणाने आता माझ्याकडे गुरव तलाठी यांचे वरिष्ठ अधिकारी माझ्याकडे लाचेची मागणी करणार नाहीत तसेच गुरव तलाठी देखील पुन्हा माझ्याकडे लाचेची मागणी करून लाच स्विकारतील असे वाटत नाही. गुरव तलाठी यांचे पुर्ण नाव विकास ऊर्फ राजू तातोबा गुरव असे असल्याची मला माहीती मिळाली आहे.

माझ्या वडीलाजीत शेतजमीनीच्या सात बारा उतायावर चुकीची नोंद झाली असून सदर चुक दुरूस्ती करून चुकीची नोंद रद्द करून देण्याकरीता गुरव तलाठी, फाळकेवाडी यांनी माझ्याकडे सहा लाख रूपये लाचेची मागणी केली होती. मी अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय सांगली येथे तलाठी गुरव, फाळकेवाडी यांचे विरूध्द लाचमागणीचा तक्रारी अर्ज दिल्यानंतर श्री. गुरूदत्त मोरे, पोलीस निरीक्षक अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो सांगली यांनी दि.11.12.2021 रोजी पंचासमक्ष केले पडताळणी कारवाईमध्ये माझ्या जमीनीच्या सातबारा उतायावर झालेली चुकीची नोंद रद्द करण्यासाठी विकास ऊर्फ राजू तातोबा गुरव, तलाठी फाळकेवाडी ता.वाळवा जि. सांगली यांनी माझ्याकडे 6,00,000/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. म्हणून माझी त्यांचे विरूध्द फिर्याद आहे.

माझा मराठी मध्ये टाईप केलेला वर्दी जबाब मी वाचून पाहीला, तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेला आहे.

समक्ष हा दिला वर्दीजबाब,

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): श्री सुजय घाटगे.
**Rank** (पद): I (Inspector)

**No.**(क्र.): DGPPPSM8105 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with CamScanner

14. Signature/Thumb Impression of the complainant / Informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची

Name (नाव): shashikant bharat chavan
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): DGPSBCM7202

पोलीस स्टेशन ऑफीसर
इस्लामपूर पोलीस ठाणे
ता. वाळवा, जि. सांगली.



Scanned with CamScanner